# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित (उत्तेजनार्थ क्रमांक विजेती कविता)
- कवी / कवयित्रीचे नाव :- नीलिमा थिटे

---

संगीत स्वर्लोकीचे, मी गावे जराजरासे
अर्घ्य हे सप्तसूरांचे, मी द्यावे जराजरासे

जरी लाभले न कंठी, सौंदर्य मधूर स्वरांचे
संगतीत लय तालाच्या, हरवावे जराजरासे

लेवुनिया पंख स्वरांचे, मधुगीत अमृताचे
सप्तकांतुनी त्या तीनही, विहरावे जराजरासे

घेऊनिया टप्पा, ठुमरी, बंदिशी, तराणे यावे,
कधी शुद्ध स्वरांची सरगम, मी व्हावे जराजरासे

स्वर कोमल चार ही कधी ते, बरसता वेचूनि घ्यावे
अन तीव्र मध्यमा करिता, उमलावे जराजरासे

आसमंत भरुनी जावा, बेधुंद धुंद तानांनी ,
हलकेच समेवर फिरुनी, मी यावे जराजरासे

पूजा जणू परमेशाची, हे गीत संगीत माझे
तू भान विसरुनी, रसिका ऐकावे जराजरासे

Anahat Music Therapy